| | |
|---|---|
| MHKO070008952026 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.७०/२०२६</u>**<br>प्रतिक सुनिल नांद्रे<br>विरुध्द<br>कुबेर बाळू नांद्रे आणि इतर |

## <u>नि.क्र.९ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश, १९०८ चे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दुरूस्ती कामी दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिंवादीतर्फे त्यांच्या वकीलांनी युक्तीवाद केला. युक्तिवादानंतर माझे विचाराधीन आलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी हे मागितलेली सुचित दुरुस्ती मिळण्यास पात्र आहेत काय ? | ...होय |
| २. | काय आदेश? | ...अंतिम आदेशान्वये |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्या क्र. १ करिता</u>**

३. वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द वाटप व कब्जासाठी दाखल केलेला आहे. ***स्टेट ऑफ आंध्रप्रदेश आणि इतर वि. मे. पायोनियर बिल्डर्स आंध्रप्रदेश, ए.आय.आर.२००७–एस.सी.११३*** या न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालय यांनी वाद कथनामध्ये उदारपणे दुरुस्ती करण्याचा मुख्य उद्देश हा निरनिराळे दावे टाळणे असल्याचे मत नोंदवलेले आहे.

**४.** वादीने अर्जाद्वारे काही मिळकती वगळण्याची व काही मिळकती समाविष्ट करण्याची विनंती केली आहे. वादीचे कथन आहे की, तो मजकुर अनावधानाने व नजरचुकीने नमुद केलेला आहे व काही मिळकती अनावधानाने व नजरचुकीने समाविष्ट करण्याच्या राहुन गेलेल्या आहेत. प्रस्तावित दुरुस्तीची मागणी मान्य केल्यास प्रतिवादींना अडचणीचे ठरणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींना काहीएक हानी पोहोचणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादींना कुठल्याही आश्चर्यकारक वस्तुस्थितीचा सामना करावा लागणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती अर्जान्वये वादी हे कुठल्याही प्रकारे नविन केस मांडत नाही. दाव्यातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील ख–या वादाच्या मुद्दयावर निर्णय घेण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे या निष्कर्षापर्यंत मी येत आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादींनी आजरोजीपर्यंत त्यांचे म्हणणे व जबाब दावा हा दाखल केला नाही. त्यामुळे वरील सर्व कारणांचा सारासार विचार करता प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज (नि.क्र.९) हा मंजुर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तावित दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करावी.

३. वादी व प्रतिवादींनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.05.08 18:10:24 +0530

**(अ. त्रिं. मनगिरे)**

दिनांक ०८/०५/२०२६

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C.,<br>Jaysingpur. |
| Date of Dictation. | 08/05/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 08/05/2026. |
| Judgment/order uploaded on | 08/05/2026. |